महासत्ता

# संख्याशास्त्राचा समाजहितासाठी उपयोग करा-प्रा.शिर्के

कवठेमहांकाळ,ता.१०(प्रतिनिधी)-

आज सर्वच क्षेत्रांमध्ये सांख्यिकीय पद्धतींचा अवलंब मोठ्या प्रमाणात होत असून विद्यार्थ्यांनी समाजातील विविध समस्या शोधून त्या संख्याशास्त्राच्या सहाय्याने सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.तसेच विद्यार्थ्यांनी वाचनकला समृद्ध करून नियमितपणे अभ्यासेत्तर विविध पुस्तकांचे वाचन करुन नवनवीन गोष्टींची माहिती आत्मसात केली पाहिजे,असे सांगितले.

येथील पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयास भेट देऊन नव्याने सुरू केलेल्या संख्याशास्त्र विभागाची पाहणी करून संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.के.पाटील, नॅक समन्वयक प्रा.अविनाश कांबळे,संख्याशास्त्र विभागप्रमख प्रा.विजय कोष्टी,प्रा. गणेश सातपुते, प्रा.शीतल पाटील,प्रा.प्राजक्ता पाटील व संख्याशास्त्राचे विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# पर्यावरण संतुलनातून कलाव्यवहार समृद्ध होतो : डॉ. हिमांशु स्मार्त

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पर्यावरणाच्या संतुलनातून कलाव्यवहार समृद्ध होतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध नाटककार, कला व पर्यावरण अभ्यासक डॉ. हिमांशु स्मार्त यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित व्याख्यानप्रसंगी बोलताना नाटककार हिमांशु स्मार्त.**

विद्यापीठात जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्रॅम अंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'पर्यावरणासाठी संगीत' या विषयावर व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. पर्यावरण, परिसर व सहजीवन या तीन घटकांचे महत्त्व डॉ. स्मार्त यांनी सोप्या भाषेत उलघडून सांगितले. पर्यावरणाच्या सगळ्यात जवळ जाणारी कला म्हणजे संगीतकला आहे. पर्यावरणातील नाजूक संतुलन समजून घेता आले तरच ते कलेतून अभिव्यक्त करू शकतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी स्वागत केले. अतुल परीट यांनी आभार मानले.

लोकमत

# 'नाट्यशास्त्र'तर्फे देशभक्तिपर गीतगायन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील नाट्यशास्त्र अधिविभागाच्यावतीने 'मेरी मिट्टी-मेरा देश' या उपक्रमांतर्गत सोमवारी (दि. १४) देशभक्तिपर गीतगायनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. शाहू स्मारक भवनात दुपारी ४ ते ६ या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

लोकमत

# विद्यापीठात 'मोडी लिपी'साठी प्रवेश प्रक्रिया

कोल्हापूर : विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रात मोडी लिपी अभ्यासक्रमासाठी २६ पर्यंत प्रवेश घेता येणार आहे. शिवपूर्व ते स्वतंत्रकाळापर्यंत ही मुख्य लिपी होती. ती ज्ञात असल्याशिवाय संशोधन होत नाही. हे लक्षात घेऊन हा अभ्यासक्रम तयार केला आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले.

लोकमत

# दूरशिक्षण एमबीएची उद्या फेरप्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची एम.बी.ए. डिस्टन्सची फेरप्रवेश परीक्षा उद्या, रविवारी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात होणार आहे. ज्यांनी प्रवेश पूर्व अर्ज सादर केला आहे, अशांनी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून रिपोर्टिंग करायचे आहे. परीक्षेला येताना हॉल तिकीट अथवा अर्जाची व प्रवेश शुल्काची प्रत, काळा बॉलपेन व शासकीय ओळखीचा पुरावा सोबत बाळगणे आवश्यक असल्याचे संचालक प्रा.डॉ. डी. के. मोरे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
12 AUG 2023
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मोडी लिपी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातून...

शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या वतीने मोडी लिपी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. २६ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेण्याची मुदत आहे.

शिवपूर्वकाळापासून ते स्वतंत्रकाळापर्यंत प्रशासनाची व दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊ शकत नाही. या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीकरिता ही लिपी ज्ञात असणे अपरिहार्य आहे.

विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक्रम, इतिहासप्रेमी यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप यांनी केले आहे.

12 AUG 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र एमबीएची उद्या फेरप्रवेश परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची एम.बी.ए.डिस्टन्स अभ्यासक्रमाची फेरप्रवेश परीक्षा रविवारी (दि. १३) शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग येथे होणार आहे.

परीक्षेकरिता पूर्व अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून रिपोर्टिंग करायचे आहे. परीक्षेसाठी येताना विद्यार्थ्यांनी हॉल तिकीट अथवा अर्जाची व प्रवेश शुल्काची प्रत, शासकीय ओळखीचा पुरावा सोबत आणणे आवश्यक असल्याचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी कळविले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात डॉ. रंगनाथन जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागामार्फत भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास ग्रंथालय माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील, डॉ. डी. बी. सुतार, प्रा. डॉ. युवराज जाधव, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, अधिविभागातील सर्व संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# एमबीएची उद्या फेरप्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची एमबीए डिस्टन्स अभ्यासक्रमाची फेरप्रवेश परीक्षा रविवार, दि. १३ ऑगस्ट रोजी शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग येथे होणार आहे. या परीक्षेकरिता ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशपूर्व अर्ज सादर केला आहे, अशांनी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून रिपोर्टिंग करायचे आहे. परीक्षेसाठी येताना विद्यार्थ्यांनी हॉल तिकीट अथवा अर्जाची व प्रवेश शुल्काची प्रत, काळा बॉलपेन व एखादा शासकीय ओळखीचा पुरावा सोबत बाळगणे आवश्यक असल्याचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी सांगितले आहे.

सकाळ



कोल्हापूर : येथील पारितोषिक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले, सोबत एम. ए. कांबळे, अजित कांबळे.

# भोगावती महाविद्यालय गुणवत्ता शिष्यवृत्तीत प्रथम

शाहूनगर : कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयातील वाणिज्य विभागाला शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत २०२२-२३ चा ग्रामीण विभागातील गुणवत्तेचा प्रथम क्रमांक मिळाला. वाणिज्य विभागाच्या आदित्य पाटील, विजया पाटील, स्नेहा गुळवणी, अनुजा गोंगाणे, प्रतीक हवालदार, मनाली गुंजेकर, समीक्षा कवडे या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त केली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. डी. ए. चौगले यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. देशमुख, डॉ. महाजन, डॉ. जाधव, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. ए. कांबळे, प्रबंधक अजित कांबळे उपस्थित होते. यासाठी संस्थाध्यक्ष जयसिंगराव हुजरे, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, संचालक, उपप्राचार्य प्रा. डॉ. एन. एम. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर आमदार पडळकर यांची नियुक्ती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) विधान



आमदार पडळकर

परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबाबतचे पत्र विधानमंडळ सचिवालयाच्या अव्वर सचिव पुष्पा दळवी यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना दिले. या अधिसभेवर विधान परिषदेमधून एका लोकप्रतिनिधीची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी आमदार पडळकर यांची ३ ऑगस्ट रोजी नियुक्ती केली आहे. त्यांच्या अधिसभा सदस्यपदाचा कालावधी १३ मे २०२६ पर्यंत असणार आहे. या नियुक्तीबाबतचे पत्र विद्यापीठ प्रशासनाला गुरुवारी मिळाले.

सकाळ

# ऑनलाईन परीक्षा अर्जास सोमवारपासून प्रारंभ

## दूरशिक्षण एमबीएची उद्या फेरप्रवेश परीक्षा



कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर परीक्षा होणार आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सोमवार (ता. १४) पासून सुरू होणार आहे.

विनाविलंब, विलंब आणि अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदतीच्या तारखा परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज जाहीर केल्या आहेत. विनाविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची मुदत १४ ते ३१ ऑगस्टपर्यंत आहे. विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत २ ते ६ सप्टेंबर, तर अतिविलंब शुल्कासह मुदत ८ ते ११ सप्टेंबर दरम्यान आहे. विद्यापीठ हिवाळी सत्रात कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांच्या ७५१ परीक्षा होणार आहेत. दरम्यान, विद्यापीठातील दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची एमबीए डिस्टन्स अभ्यासक्रमाची फेरप्रवेश परीक्षा रविवारी (ता.१३) विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात होणार आहे .या परीक्षेकरिता ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशपूर्व अर्ज सादर केला आहे, त्यांनी सकाळी साडे अकरा वाजता उपस्थित रहावे. परीक्षेसाठी येताना विद्यार्थ्यांनी हॉल तिकीट अथवा अर्जाची व प्रवेश शुल्काची प्रत, काळा बॉलपेन व एखादा शासकीय ओळखीचा पुरावा सोबत बाळगणे आवश्यक असल्याची माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

तरुण भारत

# डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागामार्फत भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच सेट व नेट परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा अधिविभागामार्फत सत्कार करण्यात आला. विभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. युवराज जाधव, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. शिवराज थोरात, आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठ सिनेटवर आमदार पडळकर यांची नियुक्ती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर विधान



परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र विधानमंडळ सचिवालयाच्या अव्वर सचिव पुष्पा दळवी यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना दिले आहे. विद्यापीठाच्या सिनेटरवर विधान परिषदेतून एका लोकप्रतिनिधीची निवड केली जाते. यामध्ये पडळकर यांना संधी मिळाली आहे. विधान परिषद उपसभापतींनी पडळकर यांची नेमणूक केली आहे. ३ ऑगस्ट २०२३ पासून १३ मे २०२६ पर्यंत पडळकर सिनेट सदस्य म्हणून कायम राहतील. पडळकर यांना भाजपच्या कोट्यातून विधान परिषदेवर संधी मिळाली आहे.